(148)

लोकमत | मुंबई
शनिवार, दि. २८ एप्रिल २०१२

# Hello मुंबई

# चर्चगेट ते डहाणू थेट ल

## सकारात्मक निर्णयाचे रेल्वेमंत्र्यांचे आश्वासन, पहिल्या वर्गाच्या भाडेवा

**मुंबई** | दि. २७ (विशेष प्रतिनिधी)

चर्चगेट ते डहाणू अशी लोकल सेवा सुरू करण्यासंबंधी लवकरच सकारात्मक निर्णय घेण्यात येईल. तसेच, उपनगरी रेल्वेच्या पहिल्या वर्गाच्या भाड्यात केलेली दरवाढ रद्द करण्याचाही विचार करण्यात येईल, असे आश्वासन रेल्वेमंत्री मुकुल रॉय यांनी माजी रेल्वे राज्यमंत्री राम नाईक यांच्या नेतृत्वात भेटलेल्या शिष्टमंडळाला दिले.

या शिष्टमंडळाने गुरुवारी रॉय यांची दिल्लीत भेट घेतली. डीसीच्या ऐवजी एसी विद्युत प्रवाहाचे काम पूर्ण झाले असल्याने आता लोकल गाड्या ताशी ८० च्या ऐवजी १०० किलोमीटर वेगाने धावू शकतात. यामुळे तसेच



अद्ययावत सिग्नल व्यवस्थेमुळे उपनगरी गाड्या धावू शकतात, य नाईक यांनी रॉय यांचे लक्ष वेधले. १०० किलोमीटर गतीच्या आ नवे वेळापत्रक तयार करण्यात आणि ते करताना प्रवासी संघट विश्वासात घ्यावे, अशी मागणी त केली.

ही सूचना व्यवहार्य असल

### महत्त्वाचे

#### तरुणीची आत्महत्या

मुंबई - मालवणीतील गायकवाड नगरात राहत असलेल्या अनिषा प्रवीण डिसोझा (२१) या महाविद्यालयीन तरुणीने आज घराच्या गॅलरीतून उडी मारून आत्महत्या केली. परीक्षेत नापास झाल्याने आलेल्या नैराश्येतून तिने हे कृत्य केले. आजच परीक्षेचा निकाल जाहीर झाला होता. तिच्या मृत्यूबद्दल पालकांची कसलीही तक्रार नसल्याचे मालवणी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक रौफ शेख यांनी सांगितले.

#### बारवर छापा

मुंबई - रेस्टॉरंटच्या नावाखाली डान्सबार व वेश्या व्यवसाय सुरू असलेल्या अंधेरीतील जिप्सी बार अॅण्ड हॉटेलवर समाजसेवा शाखेच्या पोलिसांनी छापा टाकला. या ठिकाणी १३ कॉलगर्ल्स मिळून आल्या. तर बारचालक, मॅनेजरसह एकूण आठ जणांना अटक करून रोख दीड लाख रुपयांसह कागदपत्रे जप्त केली. वेस्टर्न एक्स्प्रेस हायवेवरील नटराज स्टुडिओच्या मागे जिप्सी बार सुरू होता. त्याच्या चालक साईनाथ शेट्टी (वय ४८), मॅनेजर प्रकाश मारळा (४२), कॅशियर दौलत भोसले (५[illegible]), वॉचमन रणजित रॉय (३५), स्टि[illegible] शेट्टी (३९), वेनीफर माळीएकल (४०), बबलू राय (४२) व जगन्नाथ पंडित (४८) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. बारमध्ये १६ लेडीज वेटर होत्या. गिऱ्हाईकांना पटवून वेश्या व्यवसाय चालविला जात होता.

# भ्रष्टाचारविरोधकांवर खंडणीचा गुन्हा

## कारवाई झोपडीदादांच्या इशाऱ्यावरून

भांडुप | दि. २७ (वार्ताहर)

अनधिकृत बांधकामांच्या जोरावर भांडुपमधील गुंडांनी दहशत निर्माण केली असतानाच आता अनधिकृत बांधकामांविरुद्ध तक्रार करणाऱ्या इंडिया अगेन्स्ट करप्शन या संघटनेच्या कार्यकर्त्यांनाच खंडणीच्या गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. कार्यकर्त्यांवरील ही कारवाई झोपडीदादांच्या इशाऱ्यावरून करण्यात आल्याची तक्रार इंडिया अगेन्स्ट करप्शनचे कार्यकर्ते नितीन चव्हाण यांनी परिमंडळ ७चे उपायुक्त संजय शिंत्रे यांच्याकडे केली आहे.

भांडुप गावात सुरू असलेल्या अनधिकृत बांधकामाच्या विरोधात आवाज उठविणाऱ्या राजा जोसेफ या इंडिया अगेन्स्ट करप्शनच्या कार्यकर्त्याला गुरुवारी संध्याकाळी ७च्या सुमारास येथील झोपडीदादांनी जबर मारहाण करीत पोलीस ठाण्यात नेले. या घटनेची माहिती मिळताच इंडिया अगेन्स्ट करप्शनचे कार्यकर्ते नितीन चव्हाण, हमीद सर्वेया हे भांडुप पोलीस ठाण्यात पोहोचले.

> "गुंडांना पोलिसांकडून कोणत्याही प्रकारचा आश्रय दिला जाणार नाही. सदर गुन्ह्याची सविस्तर माहिती घेऊन संबंधित दोषींवर योग्य ती कारवाई करण्यात येईल.
> - संजय शिंत्रे,
> पोलीस उपायुक्त.

खंडणीच्या गुन्ह्यात जोसेफविरुद्ध कारवाई करण्यात येत असल्याचे पाहून चव्हाण यांनी जोसेफला वैद्यकीय चाचणी करून घेण्याचा सल्ला दिला. ते पाहून पोलिसांनी जोसेफला पोलीस ठाण्याबाहेर हाकलून त्याऐवजी नितीन चव्हाण आणि हमीद सर्वेया यांनाच खंडणीच्या गुन्ह्यात अटक केली. मात्र, खंडणीच्या गुन्ह्यात जोसेफला अडकविण्यात येत असल्याचे लक्षात येताच चव्हाण यांनी या घटनेची सूचना त्याच वेळी पोलीस उपायुक्त संजय शिंत्रे यांना एसएमएसद्वारे दिली होती. अखेर, रात्री उशिरा भांडुप पोलिसांनी खंडणीच्या गुन्ह्यात दोघांना अटक केली. न्यायालयाने या दोघांची जामिनावर सुटका केली आहे.

# युनि



नाहूर-मुलुंड दरम्यान झालेल्या रेल्वे अपघातात रेल्वे कर्मचाऱ्यांना जबाबदार ठरविले जाऊ नये या मागणीसाठी एनआरएमयू आणि सीआरएमएस या रेल्वे युनियनच्या नेतृत्वाखाली मुंबई विभाग प्रबंधक कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता.